
Date: 12/12/2022

# पंतप्रधानांच्या हस्ते सिपेट आणि सीआरएमसीएचचे लोकार्पण

म. टा. वृत्तसेवा, चंद्रपूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून रविवारी दूरदृश्यप्रणालीद्वारे चंद्रपुरातील सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनीअरिंग अँड टेक्नोलॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस (सीआरएमसीएच) केंद्राचे लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला चंद्रपूर येथे केंद्रीय रसायने व पेट्रोलियम मंत्रालयाचे सहसचिव दीपक मिश्रा, सिपेटचे महासंचालक शिशिर सिन्हा, चंद्रपूर सिपेटचे संचालक अवनीध जोशी, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता हेमंत कुलकर्णी, सिपेटचे तांत्रिक संचालक मूर्ती, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी स्वागत गीतावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे संचालन शीतल भालेराव यांनी केले. चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्राचे लोकार्पण तत्कालीन पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांनी केले होते. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चंद्रपुरातील सिपेट व हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे लोकार्पण केले आहे.



लोकार्पणानंतर चंद्रपुरातील सिपेट केंद्रात अधिकाऱ्यांनी आकाशात फुगे सोडून आनंद साजरा केला.

### आतापर्यंत ४ हजार २८० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

चंद्रपूर येथील सिपेट ही देशातील ४६ वी संस्था आहे. प्लास्टिक आणि संबंधित उद्योगांच्या क्षेत्रातील मानव संसाधन व कुशल मनुष्यबळाची गरज भागविण्यासाठी आणि या क्षेत्रातील उद्योगांना तांत्रिक सहाय्य सेवा प्रदान करण्यासाठी सिपेट संस्था सुरू करण्यात आली. सद्यस्थितीत येथे तीन वर्ष कालावधी असलेले डिप्लोमा इन प्लास्टिक्स टेक्नोलॉजी (डीपीटी) आणि डिप्लोमा इन प्लास्टिक्स मोल्ड टेक्नोलॉजी (डीपीएमटी) हे दोन कोर्सेस उपलब्ध आहेत. कौशल्य विकास योजनांतर्गत आतापर्यंत ४ हजार २८० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. त्यापैकी ३ हजार ७२२ म्हणजे ८७ टक्के विद्यार्थ्यांना मोठ्या कंपन्यांमध्ये रोजगार देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र टाईम्स

Maharashtra Times

# दोन संस्थांचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण

## सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नालॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस या संस्थांचा समावेश

लोकशाही वार्ता/चंद्रपूर

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता नागपूर येथून चंद्रपुरातील दोन संस्थाचे दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने लोकार्पण करण्यात आले. यामध्ये तडाली औद्योगिक वसाहतीतील सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजी (सिपेट) व घडोली येथील सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस या संस्थांचा समावेश आहे.

सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नालॉजी (सिपेट) ही भारत सरकारच्या रसायन व पेट्रोरसायन विभाग तसेच रसायन व खते मंत्रालयाची मान्यता प्राप्त असलेली करड ९००१:२०१५ प्रमाणित नामांकित संस्था आहे. सिपेट ही संस्था संपूर्ण भारतात प्लास्टिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी तसेच प्लास्टिक अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विशेष तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मनुष्यबळ विकासाचे काम करत असून प्लास्टिक क्षेत्रातील आणि संबंधित उद्योगांच्या विकासासाठी प्रशिक्षण, तांत्रिक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य करत आहे. महाराष्ट्रात चंद्रपूर येथे प्लास्टिक आणि संबंधित उद्योगांच्या क्षेत्रातील मानव संसाधन व कुशल मनुष्यबळाची गरज भागविण्यासाठी आणि या क्षेत्रातील उद्योगांना तांत्रिक सहाय्य सेवा प्रदान करण्यासाठी केंद्र सरकारच्या संयुक्त प्रयत्नांनी सिपेट संस्था सुरू करण्यात आली आहे.



सद्यस्थितीत सिपेट, चंद्रपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता डिप्लोमा कोर्सेससाठी प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. या डिप्लोमा कोर्सेसमध्ये तीन वर्ष कालावधी असलेले डिप्लोमा इन प्लास्टिक्स टेक्नालॉजी आणि डिप्लोमा इन प्लास्टिक्स मोल्ड टेक्नालॉजी हे दोन कोर्सेस उपलब्ध आहेत. डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना देशांतर्गत तसेच विदेशात देखील बहुराष्ट्रीय प्लास्टिक उद्योग (इंटरनॅशनल प्लास्टिक इंडस्ट्रीज) मध्ये मोठ्या प्रमाणात रोजगारांच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच, सिपेट चंद्रपूरमधून कौशल्य विकास योजनांतर्गत आतापर्यंत जवळपास ४२८० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. आणि त्यापैकी ३७२२ म्हणजेच ८७ टक्के विद्यार्थ्यांना टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम लि., बॅरोक पॉलीमर प्रा.लि., जाबील सर्किट इंडिया प्रा.लि., आरसी प्लास्टो प्रा.लि. या व इतर नामांकित कंपन्यामध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

### सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्रः

केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयामार्फत आणि भारतीय वैद्यकीय संशोधन संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे ११ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. या सेंटरच्या माध्यमातून हिमोग्लोबीनोपॅथीजशी संबंधित आजाराचे संशोधन, व्यवस्थापन व नियंत्रण करण्याच्या उद्देश आहे. या संस्थेचा पायाभरणी समारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे १६ फेब्रुवारी २०१९ रोजी झाला होता. ८५.२८ कोटी निधी खर्च करून बांधण्यात आलेल्या या इमारतीमध्ये सिकलसेलशी संबंधित संशोधन केंद, प्रयोगशाळा, वसतिगृह आणि निवासी वसाहत उभारण्यात आले आहे. मध्य भारतामध्ये सिकलसेल थॅलेसेमीया या अनुवांशीक आजाराचे प्रमाण जास्त या संस्थेची निर्मिती विदर्भातील चंद्रपूर येथे करण्यात आली.

जेणेकरून महाराष्ट्रासोबत मध्यप्रदेश, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या भागातील रुग्णांनासुद्धा या संस्थेचा फायदा व्हावा. त्याकरिता स्वतंत्र संस्थेची स्थापना केंद्र सरकार मार्फत करण्यात येत आहे. या संस्थेच्या माध्यमातून सिकलसेल थॅलेसेमिया व इतर हिमोग्लोबीनशी संबंधीत आजाराचे तत्काळ व अद्ययावत तंत्रज्ञानाच्या साह्याने निदान करण्याची सुविधा पुरवण्यात येत आहे. तज्ञ शास्त्रज्ञ व प्रशिक्षित तंत्रज्ञांच्या साह्याने या सुविधा पुरवण्यात येतात.

Lokshahi Varta    Date: 12.12.2022.

सोमवार दि.१२ डिसेंबर २०२२

चंद्रपूर महासागर

पान ३

चिमूर येथे निमंत्रितांच

प्रतिनिधी

नेरी,दि.११ : झाडीबोली साहित
वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठान यांचे सं
येथील पंचायत समितीच्या राष्ट्रसंत तुक
आयोजित केले आहे. कविसंमेलनाचे उद
अध्यक्ष भूपेश पाटील यांचे हस्ते होणार अ
प्रसिद्ध कवी व लेखक डॉ. सुधीर मोते भू
पं.स.चे गट विकास अधिकारी राजेश रा
प्रल्हाद बोरकर, कवयित्री डॉ. अश्विनी रोव
चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यातील कवी आप

# पंतप्रधानांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे सिपेट, हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरचे लोकार्पण

## सिपेटमधून आतापर्यंत ४२८० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, अनेकांना मिळाला रोजगार

**प्रतिनिधी**

**चंद्रपूर,दि.११ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे चंद्रपुरातील सेंट्रल ईंस्टीट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स ईंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे लोकार्पण करण्यात आले.

नागपूर येथे विविध विकासकामांचे लोकार्पण करतांना पंतप्रधानांनी चंद्रपूर येथील कौशल्य विकासावर आधारीत रोजगार देणारी सिपेट आणि वैद्यकीय संशोधन करणा-या हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरचे रिमोट दाबून लोकार्पण केले. या कार्यक्रमाला



चंद्रपूर येथे केंद्रीय रसायने व पेट्रोलियम मंत्रालयाचे सहसचिव दीपक मिश्रा, सिपेटचे महासंचालक शिशिर सिन्हा, चंद्रपूर सिपेटचे संचालक अवनीश जोशी, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिका[illegible] डॉ. दिप्ती सुर्यवंशी, एमआय[illegible]सीचे कार्यकारी अभियंता हेमंत [illegible]कर्णी, सिपेटचे तांत्रिक संचाल[illegible] मूर्ती, प्रशासकीय अधिकारी पंकज व[illegible]मारे आदी उपस्थित होते.

यावेळी नागपूरवरून दूरदृष्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करतांना पंतप्रधान म्हणाले, नागपुरात आज ११ योजनांचे लोकार्पण होत आहे. यात चंद्रपुरातील दोन संस्थांचा समावेश आहे. सिपेटद्वारे रोजगार निर्मिती आणि हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरच्या माध्यमातून वैद्यकीय संशोधनात नवी दिशा मिळणार आहे. शिक्षण आणि आरोग्यसेवेचा विकास हा सामुहिकरित्या होणे गरजेचे आहे. तरच वंचित घटक विकासाच्या प्रक्रियेत येऊ शकतात. चौथ्या औद्योगिक क्रांतीची संधी भारत गमावू शकत नाही. या संधीचे सोने करण्यासाठी स्थायी विकास महत्वाचा आहे. त्यासाठी आपल्या पायाभूत सुविधा अद्यावत करणे आवश्यक आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

तत्पुर्वी चंद्रपूर येथे सिपेटचे महासंचालक सिन्हा म्हणाले, या संस्थेचे लोकार्पण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे, हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. चंद्रपूर येथील सिपेट ही संस्था देशातील ४६ वी संस्था आहे. ५४ वर्षात या संस्थेने कौशल्य विकासावर आधारीत रोजगाराभिमुख विद्यार्थी घडविले असून प्लास्टिक क्षेत्रात अमुल्य योगदान दिले आहे. येथे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होणारे ९० टक्क्के विद्यार्थी विविध कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहे. राज्य व केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमाने चालणारी ही संस्था चंद्रपूर व आदिवासी क्षेत्रासाठी रोजगाराची नवी संधी आहे, असे त्यांनी सांगितले.

Chandrapur Mahasagar Date: 12.12.2022.

# शिक्षा-स्वास्थ्य का विकास जरूरी



■ चंद्रपुर, ब्यूरो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के हाथों रविवार को नागपुर से आनलाइन चंद्रपुर स्थित सेंट्रल इंस्टीट्यूट आफ पेट्रोकेमिकल्स इंजीनियरिंग एंड टेक्नोलाजी (सिपेट) व सेंटर फार रिचर्स मैनेजमेंट, कंट्रोल आफ हिमोग्लोबिनोपैथी केंद्र का लोकार्पण किया गया. उन्होंने कहा कि सिपेट द्वारा रोजगार निर्मिति एवं हिमोग्लोबिनोपैथी सेंटर के माध्यम से वैद्यकीय संशोधन में नई दिशा मिलेगी. शिक्षा एवं स्वास्थ्य सेवा का विकास यह सामूहिक रूप से होने की आवश्यकता है. इससे वंचित घटक विकास की प्रक्रिया में आ सकते हैं. चौथी औद्योगिक क्रांति का अवसर भारत गंवा नहीं सकता है. इसके लिए अपनी बुनियादी सुविधाओं को अपडेट करना आवश्यक है.

**हिमोग्लोबिनोपैथी सेंटर भी किया लोकार्पित :** नागपुर में विभिन्न विकास कार्यों का लोकार्पण करते हुए प्रधानमंत्री मोदी ने चंद्रपुर स्थित कौशल्य विकास पर आधारित रोजगार देने वाले सिपेट एवं वैद्यकीय संशोधन करने वाले हिमोग्लोबिनोपैथी सेंटर का रिमोट दबाकर लोकार्पण किया. इस समय चंद्रपुर में केंद्रीय रसायन एवं पेट्रोलियम मंत्रालय के सहसचिव दीपक मिश्रा, सिपेट के महासंचालक शिशिर सिन्हा, सिपेट के संचालक अवनिध जोशी, बल्लारपुर की उपविभागीय अधिकारी डा. दीप्ति सूर्यवंशी, एमआईडीसी के कार्यकारी अभियंता हेमंत कुलकर्णी, सिपेट तकनीक संचालक मूर्ति, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे आदि उपस्थित थे.

## PM मोदी ने किया सिपेट का लोकार्पण



### जिलावासियों के लिए अनमोल भेंट : अहीर

■ ओबीसी आयोग के राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहीर ने कहा कि वर्ष 2019 को प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने पांढरकवड़ा के दौरे के समय हिमोग्लोबिनोपैथी अनुसंधान प्रबंधन एवं नियंत्रण केंद्र (सिकलसेल सेंटर) इमारत का भूमिपूजन किया था.

■ वर्ष 2016 में उनके कार्यकाल में चंद्रपुर में सिपेट की स्थापना की गई थी. 2017 में वेकोलि दुर्गापुर वर्कशाप में केंद्र प्रायोगिक तौर पर शुरू किया गया. जिसके बाद केंद्रीय मंत्री नितिन गडकरी के हाथों केंद्र की इमारत का भूमिपूजन हुआ था. रविवार को इस इमारत का लोकार्पण प्रधानमंत्री ने किया. यह जिलावासियों के लिए अनमोल भेंट है. सिकलसेल सेंटर के कारण रक्त संबंधित विभिन्न बीमारियों पर अनुसंधान करने में मदद मिलेगी.

### चंद्रपुर व आदिवासी क्षेत्र के लिए रोजगार के नए अवसर

■ सिपेट के महानिदेशक सिन्हा ने कहा कि चंद्रपुर स्थित सिपेट संस्थान देश का 46वां संस्थान है. 54 वर्षों में इस संस्थान ने कौशल विकास के आधार पर रोजगार योग्य छात्र तैयार किए हैं. प्लास्टिक के क्षेत्र में अमूल्य योगदान दिया है. यहां से प्रशिक्षण प्राप्त करने वाले 90 प्रतिशत छात्र विभिन्न कंपनियों में कार्यरत हैं.

■ राज्य और केंद्र सरकार द्वारा संयुक्त रूप से संचालित यह संस्थान चंद्रपुर और आदिवासी क्षेत्रों के लिए रोजगार का एक नया अवसर है. संचालन शीतल भालेराव ने किया. कार्यक्रम में सिपेट के तकनीकी विभाग के प्रमुख, सभी अधिकारी और कर्मचारी और छात्र उपस्थित थे.

## 4,280 विद्यार्थियों ने हासिल किया प्रशिक्षण

सेंट्रल इंस्टीट्यूट आफ पेट्रोकेमिकल्स इंजीनियरिंग एंड टेक्नोलाजी (सीआईपीईटी) एक आईएसओ 9001:2015 प्रमाणित संस्थान है. जिसे रसायन और पेट्रोकेमिकल्स विभाग और रसायन और उर्वरक मंत्रालय, भारत सरकार द्वारा मान्यता प्राप्त है. यह प्लास्टिक इंजीनियरिंग और प्रौद्योगिकी के क्षेत्र में विशेष तकनीकी प्रशिक्षण कार्यक्रमों के तहत पूरे भारत में प्लास्टिक प्रौद्योगिकी के प्रसार के साथ-साथ जनशक्ति विकास के लिए काम कर रहा है. यह प्लास्टिक क्षेत्र और संबंधित उद्योगों के विकास के लिए प्रशिक्षण, तकनीकी और ढांचागत सुविधाएं प्रदान करने के लिए भी काम कर रहा है. शैक्षणिक वर्ष 2021-22 के लिए डिप्लोमा पाठ्यक्रमों के लिए प्रवेश प्रक्रिया सिपेट में चल रही है. इन डिप्लोमा पाठ्यक्रमों में 3 वर्ष की अवधि के डिप्लोमा इन प्लास्टिक्स टेक्नोलाजी (डीपीटी) और डिप्लोमा इन प्लास्टिक्स मोल्ड टेक्नोलाजी (डीपीएमटी) नामक 2 पाठ्यक्रम उपलब्ध हैं. डिप्लोमा पास करने वाले विद्यार्थियों के लिए देश के साथ-साथ विदेशों में भी बहुराष्ट्रीय प्लास्टिक उद्योगों में बड़ी संख्या में रोजगार के अवसर है. सिपेट चंद्रपुर से लगभग 4,280 विद्यार्थियों को कौशल विकास योजना के तहत प्रशिक्षित किया गया है. इनमें से 3,722 यानी 87 प्रतिशत विद्यार्थियों को टाटा आटोकाम्प सिस्टम लि., वैरोक पालीमर प्रा.लि. जाबिल, सर्किट इंडिया प्रा. लि., आरसी प्लास्टो प्रा. लि. एवं अन्य प्रतिष्ठित कंपनियों में रोजगार उपलब्ध कराया गया है.

Navbharat Times Date: 12.12.2022

# सिपेट, हिमोग्लोबिनोपॅथी सेंटरचे लोकार्पण

## दूरदृष्यप्रणालीद्वारे पंतप्रधानांच्याहस्ते शुभारंभ

चंद्रपूर ब्युरो. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे चंद्रपुरातील सेंट्रल इंस्टीट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नोलॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथी केंद्राचे लोकार्पण करण्यात आले.

नागपूर येथे विविध विकासकामांचे लोकार्पण करताना पंतप्रधानांनी चंद्रपूर येथील कौशल्य विकासावर आधारीत रोजगार देणारी सिपेट आणि वैद्यकीय संशोधन करणाऱ्या हिमोग्लोबिनोपॅथी सेंटरचे रिमोट दाबून लोकार्पण केले. या कार्यक्रमाला चंद्रपूर येथे केंद्रीय रसायने व पेट्रोलियम मंत्रालयाचे सहसचिव दीपक मिश्रा, सिपेटचे महासंचालक शिशिर सिन्हा, चंद्रपूर सिपेटचे संचालक अवनीध जोशी, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी डॉ. दिप्ती सुर्यवंशी, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता हेमंत कुलकर्णी, सिपेटचे तांत्रिक संचालक मूर्ती, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे आदी उपस्थित होते.

यावेळी नागपूरवरून दूरदृष्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन करताना पंतप्रधान म्हणाले, नागपुरात 11 योजनांचे लोकार्पण होत आहे. यात चंद्रपुरातील दोन संस्थांचा समावेश आहे. सिपेटद्वारे रोजगार निर्मिती आणि हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरच्या माध्यमातून वैद्यकीय संशोधनात नवी दिशा मिळणार आहे. शिक्षण आणि आरोग्यसेवेचा विकास हा सामुहिकरित्या होणे गरजेचे आहे. तरच वंचित घटक विकासाच्या प्रक्रियेत येऊ शकतात. चौथ्या औद्योगिक क्रांतीची संधी भारत गमावू शकत नाही. या संधीचे सोने करण्यासाठी स्थायी विकास महत्त्वाचा आहे. त्यासाठी आपल्या पायाभूत सुविधा अद्यावत करणे आवश्यक आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

तत्पुर्वी चंद्रपूर येथे सिपेटचे महासंचालक सिन्हा म्हणाले, या संस्थेचे लोकार्पण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे, हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. चंद्रपूर येथील सिपेट ही संस्था देशातील 46 वी संस्था आहे. 54 वर्षात या संस्थेने कौशल्य विकासावर आधारीत रोजगाराभिमुख विद्यार्थी घडविले असून प्लॅस्टिक क्षेत्रात अमुल्य योगदान दिले आहे. येथे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होणारे 90 टक्क्के विद्यार्थी विविध कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहे. राज्य व केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमाने चालणारी ही संस्था चंद्रपूर व आदिवासी क्षेत्रासाठी रोजगाराची नवी संधी आहे, असे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यार्थीनींनी स्वागत गितावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे संचालन शीतल भालेराव यांनी केले. कार्यक्रमाला सिपेटचे तांत्रिक विभाग प्रमुख, सर्व अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## चंद्रपूरकरांसाठी अनमोल भेट

सिपेट व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण झाले, याचा आनंद आहे. सन 2016 मध्ये चंद्रपुरात सिपेटची उभारणी केली होती. 2017 मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या केंद्राच्या इमारतीचे भूमीपूजन केले होते. केंद्र सरकारने सिपेट इमारतीसाठी निधी मंजूर करून सर्व सोयींनी युक्त ही प्रशस्त इमारत उभारली या इमारतीचे लोकार्पण करून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे केंद्र चंद्रपूर जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील जनतेच्या सेवेत सादर केले आहे. चंद्रपूरकरांच्या आनंदात भर घालणारा हा क्षण आहे.

– हंसराज अहीर

## सिपेट संस्थेविषयी माहिती

सेंट्रल इंस्टीट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नोलॉजी (सिपेट) ही भारत सरकारच्या रसायन व पेट्रोरसायन विभाग तसेच रसायन व खते मंत्रालयाची मान्यता प्राप्त असलेली ISO 9001:2015 प्रमाणित नामांकित संस्था आहे. संपूर्ण भारतात प्लास्टिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी तसेच प्लास्टिक अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विशेष तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मनुष्यबळ विकासकामे करत आहे. तसेच प्लास्टिक क्षेत्रातील आणि संबंधित उद्योगांच्या विकासासाठी प्रशिक्षण, तांत्रिक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य करत आहे.

महाराष्ट्रात चंद्रपूर येथे प्लास्टिक आणि संबंधित उद्योगांना तांत्रिक सहाय्य सेवा देण्यासाठी केंद्र सरकारच्या संयुक्त प्रयत्नांनी सिपेट संस्था सुरू करण्यात आलेली आहे. सद्यस्थितित सिपेट, चंद्रपूर येथे शैक्षणिक वर्ष 2021-22 करिता डिप्लोमा कोर्सेसमध्ये तीन वर्ष कालावधी असलेले डिप्लोमा इन प्लास्टिक्स टेक्नोलॉजी (डीपीटी) आणि डिप्लोमा इन प्लास्टिक्स मोल्ड टेक्नोलॉजी (डीपीएमटी) हे दोन कोर्सेस आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना देश - विदेशात देखील बहुराष्ट्रीय प्लास्टिक उद्योग (मल्टीनेशनल प्लास्टिक इंडस्ट्रीज) मध्ये मोठ्या प्रमाणात रोजगारांच्या संधी उपलब्ध आहेत.

## आतापर्यंत 4280 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

आतापर्यंत जवळपास 4280 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. आणि त्यापैकी 3722 म्हणजेच 87 टक्के विद्यार्थ्यांना टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम लि., वॅरोक पॉलीमर प्रा.लि., जाबील सर्किट इंडिया प्रा.लि., आरसी प्लास्टो प्रा.लि. या व इतर नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

Navrashtra        Date: 12.12.2022

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सिपेटचे लोकार्पण

चंद्रपूर, ता. ११ : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे चंद्रपुरातील सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे लोकार्पण करण्यात आले.

नागपूर येथे विविध विकासकामांचे लोकार्पण करताना पंतप्रधानांनी चंद्रपूर येथील कौशल्य विकासावर आधारी रोजगार देणारी सिपेट आणि वैद्यकीय संशोधन करणाऱ्या हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरचे रिमोट दाबून लोकार्पण केले. या कार्यक्रमाला चंद्रपूर येथे केंद्रीय रसायने व पेट्रोलियम मंत्रालयाचे सहसचिव दीपक मिश्रा, सिपेटचे महासंचालक शिशिर सिन्हा, चंद्रपूर सिपेटचे संचालक जोशी, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी, हेमंत कुलकर्णी, सिपेटचे तांत्रिक संचालक श्री. मूर्ती, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे उपस्थित होते. सिपेटद्वारे रोजगार निर्मिती आणि हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरच्या माध्यमातून वैद्यकीय संशोधनात नवी दिशा मिळणार असल्याचे मत पंतप्रधांनी व्यक्त केले.

Sakal Date: 12.12.2022.

# चंद्रपुरातील त्या दोन नवनिर्मित संस्थांना पंतप्रधानांनी दाखविली हिरवी झेंडी

## सिपेट व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस या संस्थांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

चंद्रपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी नागपूर येथून चंद्रपुरातील दोन संस्थाचे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने लोकार्पण करण्यात आले. यामध्ये ताडाळी औद्योगिक वसाहतीतील सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (सिपेट) व पडोली येथील सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस या संस्थांचा समावेश आहे.



दूरदृष्य प्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकार्पण करताच चंद्रपुरातील सिपेट संस्थेमध्ये बलून सोडून असा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (सिपेट) ही भारत सरकारच्या रसायन व पेट्रोरसायन विभाग तसेच रसायन व खते मंत्रालयाची मान्यता प्राप्त असलेली प्रमाणित नामांकित संस्था आहे. सिपेट ही संस्था संपूर्ण भारतात प्लास्टिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी तसेच प्लास्टिक अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विशेष तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मनुष्यबळ विकासाचे काम करत असून प्लास्टिक क्षेत्रातील आणि संबंधित उद्योगांच्या विकासासाठी प्रशिक्षण, तांत्रिक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य करत आहे.

केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयामार्फत आणि भारतीय वैद्यकीय संशोधन संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे उद्घाटनसुद्धा यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. या सेंटरच्या माध्यमातून हिमोग्लोबिनोपॅथीसशी संबंधित आजाराचे संशोधन, व्यवस्थापन व नियंत्रण करण्याचा उद्देश आहे. या संस्थेचा पायाभरणी समारंभ पंतप्रधान १६ फेब्रुवारी २०१९ रोजी झाला होता. ८५.२८ कोटी निधी खर्च करून या ठिकाणी प्रशस्त इमारत उभी करण्यात आली आहे.

Lokmat Date: 12.12.2022

# पंतप्रधानांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे सिपेट आणि हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरचे लोकार्पण

देशोन्नती वृत्तसंकलन...



चंद्रपूर : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ११ डिसेंबर रोजी नागपूर येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे चंद्रपुरातील सेंट्रल इंस्टीट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे लोकार्पण करण्यात आले. नागपूर येथे विविध विकासकामांचे लोकार्पण करतांना पंतप्रधानांनी चंद्रपूर येथील कौशल्य विकासावर आधारी रोजगार देणारी सिपेट आणि वैद्यकीय संशोधन करणा-या हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरचे रिमोट दाबून लोकार्पण केले.

या कार्यक्रमाला चंद्रपूर येथे केंद्रीय रसायने व पेट्रोलियम मंत्रालयाचे सहसचिव दीपक मिश्रा, सिपेटचे महासंचालक शिशिर सिन्हा, चंद्रपूर सिपेटचे संचालक अवनीध जोशी, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी डॉ. दिप्ती सुर्यवंशी, एमआयडीसीचे कार्यकारी अभियता हेमंत कुलकर्णी, सिपेटचे तांत्रिक संचालक मूर्ती, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे आदी उपस्थित होते. याबेळी नागपूरवरून दूरदृष्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करतांना पंतप्रधान म्हणाले, नागपूरात आज ११ योजनांचे लोकार्पण होत आहे. यात चंद्रपूरातील दोन संस्थांचा समावेश आहे. सिपेटद्वारे रोजगार निर्मिती आणि हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरच्या माध्यमातून वैद्यकीय संशोधनात नवी दिशा मिळणार आहे. शिक्षण आणि आरोग्यसेवेचा विकास हा सामुहिकरित्या होणे गरजेचे आहे. तरच वंचित घटक विकासाच्या प्रक्रियेत येऊ शकतात. चौथ्या औद्योगिक क्रांतीची संधी भारत गमावू शकत नाही. या संधीचे सोने करण्यासाठी स्थायी विकास महत्वाचा आहे. त्यासाठी आपल्या पायामूल सुविधा अद्यावत करणे आवश्यक आहे, असे पंतप्रधान म्हणाले. तत्पुर्वी चंद्रपूर येथे सिपेटचे महासंचालक सिन्हा म्हणाले, या संस्थेचे लोकार्पण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे, हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. चंद्रपूर येथील सिपेट ही संस्था देशातील ४६ वी संस्था आहे. ५४ वर्षात या संस्थेने कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख विद्यार्थी घडविले असून प्लास्टिक क्षेत्रात अमुल्य योगदान दिले आहे. येथे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होणारे ९० टक्के विद्यार्थी विविध कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहे.

## सिपेट इमारतीचे लोकार्पण चंद्रपूरकरांसाठी अनमोल भेट : हंसराज अहिर



चंद्रपूरातील आय सी एम आर हिमोग्लोबिनोपॅथी अनुसंधान प्रबंधन व नियंत्रण केंद्र (सिकलसेल सेंटर) तसेच सिपेट सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी च्या इमारतीचे लोकार्पण नागपूर येथुन आभासी पध्दतीने केले याचा आनंद असल्याचे हंसराज अहीर यांनी म्हटले आहे. सन २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांनी पाढरकवडा येथे आले असतांना हिमोग्लोबिनोपॅथी अनुसंधान प्रवधन व नियंत्रण केंद्राच्या (सिकलसेल सेंटर) इमारतीचे भुमिपूजन केले होते. युपीए सरकारच्या राजवटीत हंसराज अहीर यांच्या सतत प्रयत्नांतून या केंद्राला मान्यता प्रदान करण्यात आली होती परंतु निधीअभावी हे काम पुर्णत्वास गेले नव्हते मात्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी च्या काळात भरीव निधी उपलब्ध झाल्यानंतर हे काम पुर्णत्वास येवून त्याचे लोकार्पणही मोदीच्या शुभहस्ते संपन्न झाले आहे.

Date : 12.12.2022

Deshonnati

# पीएम ने हीमोग्लोबिनोपैथी केंद्र व सिपेट का लोकार्पण किया

**विश्वास** रोजगार व चिकित्सा अनुसंधान को नई दिशा मिलने की बात भी कही

लोकमत समाचार सेवा

**चंद्रपुर :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने नागपुर में 11 दिसंबर को विकास कार्यों के 11 सितारों के लोकार्पण के दौरान उनमें शामिल दो सितारे चंद्रपुर के भी होने पर जिले के लोगों को बधाई दी. उन्होंने कहा कि इनमें से एक 'सिपेट' के कारण रोजगार सृजन होगा तथा हीमोग्लोबिनपैथी केंद्र से चिकित्सा क्षेत्र में अनुसंधान को नई दिशा मिलेगी. श्री मोदी ने इस अवसर पर विश्वास व्यक्त किया कि शिक्षा तथा स्वास्थ्य सेवा का सामूहिक विकास होने पर वंचित वर्ग विकास की मुख्य धारा में शामिल हो सकेगा. वे ऑनलाइन प्रणाली से चंद्रपुर के सेंट्रल इंस्टीट्यूट ऑफ पेट्रो केमिकल्स इंजीनियरिंग एंड टेक्नोलॉजी (सिपेट) तथा सेंटर फॉर रिसर्च, मैनेजमेंट, कंट्रोल ऑफ हीमोग्लोबिनपैथी केंद्र के लोकार्पण अवसर पर विचार व्यक्त कर रहे थे.

इस कार्यक्रम में चंद्रपुर के केंद्रीय रसायन एवं पेट्रोलियम मंत्रालय के सहसचिव दीपक मिश्रा, सिपेट के महा संचालक शिशिर सिन्हा, चंद्रपुर के संचालक अवनीध जोशी, बल्लारशाह उपविभागीय अधिकारी डॉ. दीप्ति सूर्यवंशी, एमआईडीसी के कार्यकारी अभियंता हेमंत कुलकर्णी, सिपेट के तकनीकी संचालक मूर्ति, प्रशासनिक अधिकारी पंकज वाघमारे आदि उपस्थित थे. सिपेट के महासंचालक सिन्हा ने कहा कि इस संस्था का लोकार्पण प्रधानमंत्री मोदी के हाथों होना बेहद खुशी की बात है.

चंद्रपुर की सिपेट संस्था देश की 46वीं संस्था है. 54 साल में इस संस्था ने कौशल पर आधारित रोजगाराभिमुख छात्र बनाए और प्लास्टिक क्षेत्र में अनमोल योगदान दिया. यहां प्रशिक्षण लेकर सफल हुए 90 प्रतिशत छात्र विभिन्न कंपनियों में नौकरी कर रहे हैं. राज्य व केंद्र सरकार के संयुक्त तत्वावधान में चलने वाली यह संस्था चंद्रपुर तथा आदिवासी क्षेत्र में रोजगार के नए अवसर प्रदान करेगी. इस दौरान दीप प्रज्ज्वलन गणमान्य अतिथियों ने किया. इस अवसर पर छात्रों ने स्वागत गीत पर नृत्य पेश किया. कार्यक्रम का संचालन शीतल भालेराव ने किया. कार्यक्रम में सिपेट के तकनीकी विभाग प्रमुख, सभी अधिकारी, कर्मचारी तथा छात्र उपस्थित थे.



सिपेट तथा हिमोग्लोबिनोपैथी केंद्र का रिमोट दबाकर लोकार्पण करते प्रधानमंत्री मोदी. दूसरे चित्र में सिपेट में लोकार्पण के अवसर पर उपस्थित अधिकारी तथा कर्मचारी.

## मुख्य बिंदु

**विकास कार्यों के 11 सितारों में से दो सितारे चंद्रपुर के भी होने पर जिले के लोगों को दी बधाई**

शिक्षा तथा स्वास्थ्य सेवा का सामूहिक विकास होने पर विकास की मुख्य धारा में शामिल होंगे वंचित

**सिपेट के महासंचालक सिन्हा ने संस्था का लोकार्पण पीएम के हाथों होने पर खुशी व्यक्त की**

Lokmat Samachar

Date : 12.12.2022

# शिक्षा और स्वास्थ्य सेवा का सामूहिक विकास होना अत्यंत आवश्यक : मोदी



## चंद्रपुरवासियों के लिए अनमोल भेंट : अहिर

पीएम के हाथों लोकार्पण पर राष्ट्रीय पिछड़ा आयोग के अध्यक्ष हंसराज अहिर ने कहा कि, यह चंद्रपुरवासियों के लिए अनमोल भेंट है। 2019 में पीएम मोदी के पांढरकवड़ा आने पर हीमोग्लोबिनोपैथी रिसर्च मैनेजमेंट एंड कंट्रोल सेंटर (सिकलसेल सेंटर) के भवन का शिलान्यास किया था। यूपीए सरकार के शासनकाल में उनके निरंतर प्रयास से इस केंद्र को मंजूरी मिली थी, लेकिन निधि की कमी के कारण काम पूरा नहीं हो सका। 2016 में, जब हंसराज अहिर केंद्रीय रसायन और उर्वरक राज्य मंत्री थे, उनके कार्यकाल में चंद्रपुर में सिपेट का निर्माण किया गया केंद्रीय मंत्री नितीन गडकरी ने केंद्र के भवन की आधारशिला रखी थी। केंद्र सरकार ने सिपेट भवन के लिए निधि मंजूर कर सभी सुविधा के साथ इस विशाल भवन का निर्माण किया। आज इसका लोकार्पण किया गया। सिपेट केंद्र चंद्रपुरवासियों के लिए अनमोल भेंट होगी ऐसा अहिर ने कहा है।

- पीएम ने रिमोट दबाकर किया सिपेट और हिमोग्लोबिनपैथी सेंटर का लोकार्पण

ब्यूरो | चंद्रपुर

नागपुर से टेलीविजन प्रणाली के माध्यम से मार्गदर्शन करते हुए प्रधानमंत्री मोदी ने कहा कि, आज नागपुर में 11 योजनाओं का लाकार्पण हो रहा है। इसमें चंद्रपुर के दो संस्थान शामिल हैं। सिपेट के माध्यम से रोजगार और हीमोग्लोबिनोपैथी केंद्र के माध्यम से चिकित्सा अनुसंधान में नई दिशा मिलेगी। शिक्षा और स्वास्थ्य सेवा का सामूहिक विकास आवश्यक है। तभी वंचित घटक विकास की प्रक्रिया में आ सकते हैं। भारत चौथी औद्योगिक क्रांति के अवसर को खोने का जोखिम नहीं उठा सकता। अवसर का लाभ उठाने के लिए स्थायी विकास महत्वपूर्ण है। इसके लिए बुनियादी सुविधा का आधुनिकीकरण आवश्यक है।

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के हाथों नागपुर से रिमोट दबाकर चंद्रपुर के सेंट्रल इंस्टीट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजीनियरिंग एंड टेक्नोलॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च मैनेजमेंट, कंट्रोल ऑफ हीमोग्लोबिनोपैथी केंद्र का लोकार्पण किया गया। इस अवसर पर प्रधानमंत्री मोदी बोल रहे थे। कार्यक्रम में केंद्रीय रसायन व पेट्रोलियम मंत्रालय के सहसचिव दीपक मिश्रा, सिपेट के महासंचालक शिशिर सिन्हा, चंद्रपुर सिपेट के संचालक अवनीध जोशी, बल्लारपुर की उपविभागीय अधिकारी डॉ. दीप्ति सूर्यवंशी, एमआइडीसी के कार्यकारी अभियंता हेमंत कुलकर्णी, सिपेट के तकनीकी संचालक मूर्ति, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे आदि उपस्थित थे।

इसके पूर्व चंद्रपुर के सिपेट महासंचालक सिन्हा ने कहा कि, संस्था का लोकार्पण देश के प्रधानमंत्री के हाथों हो रहा है यह आनंद का क्षण है। चंद्रपुर की सिपेट संस्था देश की 46वीं संस्था है। 54 वर्ष में संस्था ने कौशल विकास पर आधारित रोजगारभिमुख विद्यार्थी तैयार कर प्लास्टिक क्षेत्र में कीमती योगदान दिया है।

यहां प्रशिक्षण लेकर उत्तीर्ण 90 प्रतिशत विद्यार्थी विविध कंपनियों में नौकरी कर रहे हैं। राज्य और केंद्र सरकार के संयुक्त प्रयास से चलाई जा रही संस्था चंद्रपुर और आदिवासी क्षेत्र में रोजगार के नये अवसर उपलब्ध कराएगी। शेष | पेज 14 पर

Dainik Bhashkar


Date: 12.12.2022

# पंतप्रधानांच्या हस्ते 'सिपेट' व 'हिमोग्लोबिनोपॅथीस'चे लोकार्पण

◆ चंद्रपूर, ११ डिसेंबर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे चंद्रपुरातील 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नोलॉजी' (सिपेट) व 'सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस' केंद्राचे लोकार्पण करण्यात आले.

नागपूर येथे विविध विकासकामांचे लोकार्पण करताना पंतप्रधानांनी चंद्रपूर येथील कौशल्य विकासावर आधारित रोजगार देणारी सिपेट आणि वैद्यकीय संशोधन करणाऱ्या हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरचे 'रिमोट स्विच' दाबून लोकार्पण केले. या कार्यक्रमाला चंद्रपूर येथे केंद्रीय रसायने व पेट्रोलियम मंत्रालयाचे सहसचिव दीपक मिश्रा, सिपेटचे महासंचालक शिशीर सिन्हा, चंद्रपूर सिपेटचे संचालक अवनीध जोशी, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी डॉ. दिप्ती सूर्यवंशी, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता हेमंत कुलकर्णी, सिपेटचे तांत्रिक संचालक मूर्ती, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे आदी उपस्थित होते.



दूरदृष्यप्रणालीद्वारे सिपेट व हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे लोकार्पण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

नागपूरवरून दूरदृष्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करताना पंतप्रधान म्हणाले, नागपुरात आज ११ योजनांचे लोकार्पण होत आहे. यात चंद्रपुरातील दोन संस्थांचा समावेश आहे. सिपेटद्वारे रोजगारनिर्मिती आणि हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरच्या माध्यमातून वैद्यकीय संशोधनाला नवी दिशा मिळणार आहे.

शिक्षण आणि आरोग्य सेवेचा विकास हा सामुहिकरित्या होणे गरजेचे आहे. तरच वंचित घटक विकासाच्या प्रक्रियेत येऊ शकतात. चौथ्या औद्योगिक क्रांतीची संधी भारत गमावू शकत नाही. या संधीचे सोने करण्यासाठी स्थायी विकास महत्त्वाचा आहे. त्यासाठी आपल्या पायाभूत सुविधा अद्ययावत करणे आवश्यक आहे.

तत्पूर्वी, सिन्हा म्हणाले, चंद्रपूर येथील सिपेट ही संस्था देशातील ४६ वी संस्था आहे. ५४ वर्षांत या संस्थेने कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख विद्यार्थी घडविले असून, प्लॅस्टिक क्षेत्रात अमूल्य योगदान दिले आहे. येथे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होणारे ९० टक्के विद्यार्थी विविध कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहेत. राज्य व केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमाने चालणारी ही संस्था चंद्रपूर व आदिवासी क्षेत्रासाठी रोजगाराची नवी संधी आहे, असे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी, मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी स्वागतगितावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे संचालन शीतल भालेराव यांनी केले. कार्यक्रमाला सिपेटचे तांत्रिक विभाग प्रमुख, सर्व अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नोलॉजी (सिपेट) ही भारत सरकारच्या रसायन व पेट्रोरसायन विभाग तसेच रसायन व खते मंत्रालयाची मान्यता असलेली आयएसओ ९००१:२०१५ प्रमाणित नामांकित संस्था आहे. संपूर्ण भारतात प्लॅस्टिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी तसेच प्लॅस्टिक अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात विशेष तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत मनुष्यबळ विकासाचे काम करीत आहे.

तसेच प्लॅस्टिक क्षेत्रातील आणि संबंधित उद्योगांच्या विकासासाठी प्रशिक्षण, तांत्रिक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य करीत आहे.

◆(तभा वृत्तसेवा)

Tarun Bharat

# पंतप्रधानांच्या हस्ते सिपेट, हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरचे लोकार्पण

## 'रोजगार निर्मिती आणि वैद्यकीय संशोधनाला नवी दिशा मिळणार'

**लोकसत्ता वार्ताहर**

**चंद्रपूर :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नागपूर येथून दूरदृश्यप्रणालीद्वारें चंद्रपुरातील सेंट्रल इंस्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल्स इंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजी (सिपेट) व सेंटर फॉर रिसर्च, मॅनेजमेंट, कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनोपॅथीस केंद्राचे लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला चंद्रपूर येथे केंद्रीय रसायने व पेट्रोलियम मंत्रालयाचे सहसचिव दीपक मिश्रा, सिपेटचे महासंचालक शिशिर सिन्हा, चंद्रपूर सिपेटचे संचालक अवनीध जोशी, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता हेमंत कुलकर्णी, सिपेटचे तांत्रिक संचालक मूर्ती, प्रशासकीय अधिकारी पंकज वाघमारे आदी उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान म्हणाले, नागपुरात आज ११ योजनांचे लोकार्पण होत आहे. यात चंद्रपुरातील दोन संस्थांचा समावेश आहे. सिपेटद्वारे रोजगार निर्मिती आणि हिमोग्लोबिनोपॅथीस सेंटरच्या माध्यमातून वैद्यकीय संशोधनात नवी दिशा मिळणार आहे. शिक्षण आणि आरोग्यसेवेचा विकास हा सामूहिकरित्या होणे गरजेचे आहे, तरच वंचित घटक विकासाच्या प्रक्रियेत येऊ शकतात. चौथ्या औद्योगिक क्रांतीची संधी भारत गमावू शकत नाही. या संधीचे सोने करण्यासाठी स्थायी विकास महत्त्वाचा आहे. त्यासाठी आपल्या पायाभूत सुविधा अद्ययावत करणे आवश्यक आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

२०१६ मध्ये हंसराज अहीर केंद्रीय रसायन व उर्वरक राज्यमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात सिपेटची उभारणी झाली होती. तत्पूर्वी चंद्रपूर येथे सिपेटचे महासंचालक सिन्हा म्हणाले, या संस्थेचे लोकार्पण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे, हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. चंद्रपूर येथील सिपेट ही संस्था देशातील ४६ वी संस्था आहे. ५४ वर्षात या संस्थेने कौशल्य विकासावर आधारित रोजगाराभिमुख विद्यार्थी घडवले असून प्लास्टिक क्षेत्रात अमूल्य योगदान दिले आहे. येथे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होणारे ९० टक्के विद्यार्थी विविध कंपन्यांमध्ये नोकरी करीत आहे. राज्य व केंद्र सरकारच्या संयुक्त विद्यमाने चालणारी ही संस्था चंद्रपूर व आदिवासी क्षेत्रासाठी रोजगाराची नवी संधी आहे. चंद्रपूर येथील कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी स्वागतगीतावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे संचालन शीतल भालेराव यांनी केले. कार्यक्रमाला सिपेटचे तांत्रिक विभाग प्रमुख, सर्व अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Loksatta

Date: 12.12.2022.